ISSN–2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–X, Issues– III May - June 2021

# महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारांची प्रासंगिकता

प्रा. महादेव क्षीरसागर

समाजश्री प्रशांतदादा हिरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, नामपूर

ता. बागलाण जी. नाशिक

**प्रस्तावना:-**

महात्मा गांधी भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील अग्रदूत म्हणून ओळखले जातात. सत्य, अहिंसा, व सत्याग्रह या मार्गाने ब्रिटीशांशी लढा देत भारताला स्वातंत्र्य मिळवून देणारे स्वातंत्र्यसेनानी व भारती यांचे राष्ट्रपिता म्हणून महात्मा गांधी संपूर्ण जगाला परिचित आहेत. भारतीय राजकारण आणि समाजकारणात महात्मा गांधीजींचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. त्यांचे विचार संबंध मानवजातीला शांततेचा मार्ग अनुसरून गतिमान करणारे आहे. गांधीजींच्या विचारांची प्रस्तुतता व विस्तार एवढा व्यापक आहे की त्यांना वगळून भारताच्या विकासाची कल्पना करणे अर्धवट ठरेल. त्यांच्या स्वातंत्र्य, समता, न्याय, विवेक, स्वयंशासन, साधी राहणी, उच्च विचारसरणी, नैतिक समाज अशा विविध पैलूंचा जगभर स्वीकारले जातात.

*Aarhat Publication & Aarhat Journals* is licensed Based on a work at *http://www.aarhat.com/amierj/*

महात्मा गांधी जेव्हा भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व करत होते त्या वेळच्या जागतिक परिस्थितीचा त्यांनी अभ्यास केला व तत्कालीन जागतिक प्रश्नावर ही भाष्य केले. त्यामुळे त्यांच्या विचाराला जागतिक संदर्भही आहे. त्यामुळे आज गांधी विचारांची चर्चा जागतिक पातळीवर होत आहे. महात्मा गांधी हे एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व आहे. त्यांचे विचार हे अध्यात्मिक, शैक्षणिक, राजकीय, सामाजिक, धार्मिक, संस्कृती व पर्यावरणीय अशा क्षेत्रांनी

व्यापून टाकणारे आहेत. त्यांच्या विचारांचा एकेक पैलू विचारात घेतला असता त्यांच्या विचारांची सद्यस्थितीतील प्रासंगिकता लक्षात येते.

**उद्दिष्टे:-**

1) गांधी विचारांचा अभ्यास करणे

2) गाँधी विचारांची आज असलेली उपयोगिता अभ्यासने

**संशोधन पद्धति:-**

प्रस्तुत शोधनिबन्धमध्ये दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये गांधी विचारांची पुस्तके ,लेख ,वर्तमान पत्रातील लेख ,गांधी विचारावरील साहित्य, इंटरनेट वरील माहिती इत्यादी

गांधीजींचे अर्थशास्त्र हे सलगपणे विकसित झालेले नसून क्रमाक्रमाने त्यात परिवर्तन होत गेलेले दिसते. त्यांच्या विचारांच्या विकासाच्या तीन अवस्था दाखविता येतात

1) गांधीजींच्या आर्थिक विचारांची एक प्रकारे नकारात्मक अवस्था 1919 पर्यंत दिसून येते. त्यांनी लिहिलेल्या हिंदस्वराज मध्ये हे पूर्णपणे भौतिकवाद विरोधी भूमिका घेतलेली असून पश्चिमात्य संस्कृतीला नाकारले आहे.

2) 1919 ते 34 या काळातील त्यांचे विचार सकारात्मक अवस्था दर्शवितात. या काळात त्यांनी स्वदेशी चळवळीचा विचार मांडून पश्चिमात्य पद्धतीला एक पर्याय दाखविला.व्यवहारिक कृतीने भारलेल्या या तिसऱ्या अवस्थेत त्यांनी सर्वोदयाची कल्पना मांडून ग्रामोद्योग ,खादी व कुटीर उद्योग इत्यादींच्या संदर्भात कार्य केले.

3) गांधीजींनी आपले आर्थिक विचार वेगळे न मांडता जीवनविषयक तत्वज्ञानाचे एक अंग मानले. त्यामुळे अर्थशास्त्राच्या प्रस्थापित तत्त्वांवर अवलंबून न राहता त्यांनी जीवनतत्वज्ञानाची मूलभूत अंगे या अंगाला लागू केली. या जीवनात तत्वज्ञानाच्या मूलभूत

4) तत्वांचा अभ्यास केल्यास आपल्याला त्यामध्ये गांधीजींचे अर्थशास्त्र सापडते.

**गांधीजींच्या जीवनमूल्य तत्वांमधील अर्थशास्त्र आणि त्याची आजची प्रासंगिकता:**

1) **स्वदेशी:-** स्वदेशीची कल्पना टिळकांनी मांडली, परंतु तिचा पुरस्कार गांधीजींनी केला._ब्रिटिश वस्तूंच्या आक्रमणामुळे भारतीय वस्तूंची बाजारपेठ नेस्तनाबूत झाली होती, ग्रामोद्योग बंद झाले होते, बेकारी वाढली होती या समस्या कमी करावयाच्या असतील तर स्वदेशीचा पुरस्कार करावा, स्वदेशीला उत्तेजन द्यावे; त्यामुळे देशी उद्योगांना संरक्षण मिळेल. देशी उत्पादन, रोजगार, उत्पन्न, राहणीमान यात वाढ करता येईल. देशातील उद्योजकतेला चालना मिळेल. बाजारपेठेवर आलेले विदेशी वस्तूंचे आक्रमण थांबवता येईल. देशाबाहेर जाणारी संपत्ती, भांडवल देशातच वापरता येईल. एवढे सगळे लाभ स्वदेशी वस्तूमुळे मिळणार असतील तर, सुरुवातीला स्वदेशी वस्तूंचा दर्जा निकृष्ट असला तरी त्याचा फारसा विचार करू नये. देश आर्थिकदृष्ट्या सक्षम होईल. स्वदेशीचा स्वीकार म्हणजे विदेश व्यापार किंवा वस्तूंचा त्याग नव्हे तर शेजाऱ्याची सेवा, बंधुभावाचा प्रसार स्वदेशीचा अर्थ त्यांना अभिप्रेत होता.

जागतिकीकरणाच्या युगात बहुराष्ट्रीय कंपन्या म्हणजे_इतिहासातील वसाहतवादाचेच एक रूप आहेत. वसाहतवादासारख्या दोषांना कमी करावयाचे असेल तर; गांधीजींच्या स्वदेशी तत्त्वाचा आज पुरस्कार करण्याची गरज आहे. तसेच मोदी सरकारने सुरू केलेल्या स्टार्ट अप इंडिया, स्किल इंडिया, मेक इन इंडिया ही धोरणे स्वदेशीच्या जीवन मूल्य तत्वांशी जुळणारी आहेत. या संकल्पनेमुळे भारतातील बेरोजगारीची समस्या दूर होऊ शकते, सर्वजनिक कर्जाची समस्येची तीव्रता कमी होते, शकते, आपल्या देशाचे दुसऱ्या देशावरील अवलंबित्व कमी होऊन देश सार्वभौम होण्यास मदत होईल.

2) **ग्राम स्वराज्य:-** ग्रामस्वराज्य आणि स्वावलंबन गांधी अर्थशास्त्राचा गाभा होता. अन्न-वस्त्र-निवारा या गरजांच्या संदर्भात खेडी स्वयंपूर्ण असावीत, ही संकल्पना प्राचीन भारतात होती. तिचे पुनरुज्जीवन व्हावे असे त्यांना वाटत होते. उत्पादन, विभाजन, उपयोग व वितरण या आर्थिक क्रिया एकावेळी व्हाव्यात; उत्पादन प्रामुख्याने स्थानिक बाजारासाठी व्हावे,खेड्यांमध्ये कृषी संपन्नता, असावी प्रत्येक खेडे स्वयंपूर्ण असावे असे त्यांचे मत होते.

जागतिकीकरणाच्या युगात आर्थिक स्थैर्याचा प्रश्न गंभीर बनलेला आहे. 2006 पासून अमेरिकेत निर्माण झालेली महामंदी, ज्यामुळे संपूर्ण जग होरपळून निघाले आहे. अशा महामंदीच्या संकटातून जगाला बाहेर काढण्यासाठी गांधीजीच्या ग्रामस्वराज हे तत्व उपयोगी पडू शकते. तसेच आजच्या असमतोल पर्यावरणीय दुष्परिणामांना सामोरे जात असताना टिकावू साध्य करण्यासाठी देखील येईल गांधीजींच्या ग्रामस्वराज्याची मूलभूत संकल्पना उपयोगी पडू शकते.

3) **कुटीर उद्योगाची भूमिका:-** गांधीजींनी मोठ्या प्रमाणावरील प्राचीन वाक्य धरतीच्या औद्योगीकरणाला व यांत्रिकीकरणाला विरोध दर्शविला होता यंत्राच्या साहृयाने होणाऱ्या मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाला गांधीजींचा विरोध होता गांधीजींच्या मते त्यामुळे अनेक सामाजिक आणि आर्थिक समस्या निर्माण होतील भारतात श्रमशक्ति मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे भांडवलाची टंचाई आहे तेव्हा श्रमाचा जास्तीत जास्त वापर करून कुठे उद्योग व गार ग्राम उद्योग सुरू करण्यातच सगळ्यांचे हित आहे असे त्यांचे मत होते संस्कृतीला त्यांचा पूर्ण विरोध असला तरी याचा वापर करू नये इतकी टोकाची_भूमिका त्यांची नव्हती यंत्राचा वापर विवेकपूर्ण व्हावा ाणसं बेकार करून उपासमारीच्या खाईत लोटणाऱ्या यांत्रिकीकरणाला त्यांचाए विरोध होता भारतीय शेतकरी दरिद्री आहे वर्षातून चार महिने त्याला काम मिळते शेतीला पूरक उद्योग नसतात म्हणून दारिद्र्यात भर पडते यासाठी

सहाय्यक उद्योगांची गरज आहे हे कुटीर उद्योग हे खेड्यातील जीवनाशी व साधनसामग्रीची सुसंगत असला पाहिजे त्यांच्या विकासाला खेड्यात नैसर्गिक वाव असतो असे गांधीजींचे कुटीरउद्योग यांच्या संदर्भात सामान्य धोरण होते. अशा कुटीर उद्योगांना सरकारने संरक्षण द्यावे व ग्रामीण व कुटीर उद्योगांना मदत व मार्गदर्शन मिळावे म्हणूनच त्यांनी अखिल भारतीय चरखा संघ, अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ या संस्थाही_स्थापन केल्या.

आजच्या प्रगत काळात मानसिक तणाव, शोषण, प्रदूषण, औद्योगिक अपघात यांचे वाढते प्रमाण पाहता गांधीजींच्या या विचारांमध्ये निश्चितपणे सत्यांशी दिसतो. पुनरुत्पादन संसाधने आणि पुनरुत्पादन साधने यांचे आज चर्चा होत असून खनिज सारख्या साधनांचे साठे घटत चालले आहेत. त्यांची गंभीर सूचना शास्त्रज्ञ देत आहेत. यावर कुटीर उद्योग व ग्राम उद्योग हा रामबाण उपाय आहे. यातून उद्योगांचे विकेंद्रीकरण होण्यास मदत होईल. त्यामुळे आजच्या शहरांची अफाट वाढ, प्रदूषण, मक्तेदारी, शोषण, हिंसा अशी संकटे दूर होण्यास मदत होईल.सारांश, गांधीजींचा औद्योगीकरण याकडे पाहण्याचा दृष्टिकोण केवळ भौतिकवादी नसून मुख्यतः नैतिक आहे. आधुनिक प्रगतीला त्यांनी संपूर्ण विरोध केला नाही: पण जो केला तो सुद्धा डोळसपणे केला.

4) **विश्वस्ताची संकल्पना:-** गांधीजींच्या आर्थिक विचारांमध्ये विश्वस्त संकल्पनेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. गांधीजींनी ज्या उदात्त तत्त्वांचा पुरस्कार केला; त्यात अहिंसा, अपरिग्रह यांना स्थान आहे. अपरिग्रह म्हणजे संग्रह न करण्याची वृत्ती होय. या कल्पनेतूनच विश्वस्त संकल्पना विकसित झाली. समाजातील श्रीमंत यांनी स्वतःला आपल्या संपत्तीचा मालक न समजता विश्वस्त समजावे. यासाठी आपल्या संपत्तीचा किमान भाग गरजा भागवण्यासाठी वापरावा. उरलेला समाजासाठी खर्च करावा. संपत्तीचे संवर्धन_आणि संरक्षण करावे. जर एखाद्या वापर उद्योगातून नफा झाला किंवा वडिलोपार्जित घर मिळाले तर ती

ISSN–2278-5655
AMIERJ
Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–X, Issues– III May - June 2021

समाजाची मानवी.ही संकल्पना भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे समांतर अर्थव्यवस्थेत रूपांतर करण्याचे साधन होते. आवश्यक तेवढ्या संपत्तीचा उपभोग व्यक्तीने घ्यावा.किमान वेतन प्रमाणे कमाल वेतनही मर्यादा असावी. तसेच उत्पादनाचे स्वरूप व्यक्तीच्या इच्छेवर अवलंबून न राहता ते सामाजिक गरजा नुसार निश्चित करावे.संकल्पनेवर गांधीजींचा एवढा विश्वास होता की हृदय परिवर्तन होऊन श्रीमंत व्यक्ती आपल्या संपत्तीचा हिस्सा खुशीने समाजाला देतील. त्यामुळे ऐंशीच्या वेगाने आर्थिक विषमता कमी होईल.

5) **साम्यवाद, गांधीवाद:-** आत्तापर्यंत स्पष्ट केलेल्या अनेक गांधीवादी कल्पना समाजवादी किंवा साम्यवादी कल्पनांशी जुळणारया वाटतात. काही बाबतीत सारखेपणा वाटतो. महत्त्वाच्या उद्योगांवर शासनाचे नियंत्रण असले तरी शेती व इतर क्षेत्रात सामूहिक सहकारी प्रयत्नांना चालना, केंद्रीकरणाला विरोध वगैरे तत्वे समाजवादाच्या जवळचे वाटतात. आपण कामगारांचे राज्य स्थापन करू शकतो, स्वतःला समाजवादी म्हणविणारे खऱ्या अर्थाने समाजवादी होते.गांधीजींना तथाकथित समाजवादी व साम्यवादही मान्य नव्हता. त्यांचे विचार स्वतःचे वेगळे होते. गांधीवादाचे उद्दिष्ट व्यक्तीचा विकास होते. ते आज व्यक्तीच्या आर्थिक कल्याणाशी जोडले जाते; मोजले जाते. साम्यवाद समाजवादात आढळते.

6) **चरखा:-** "खेडयाकड़े चला", असा संदेश देण्या बरोबरच कृषीसंबंधित श्रमप्रधानउद्योगांचे महत्त्व गांधीजीनी सांगितले आहे.ग्रामीण भागातील जनतेला स्वयंपूर्ण करण्यासाठी गांधीजीनी कुटीर उद्योगांचे महत्व पटवून दिले आहे.चरखा हे त्याचे उत्तम उदाहरण त्यानी सर्वांसमोर ठेवले आहे.कमी भांडवलाच्या आणि जास्तीत जास्त रोजगार देणारी लहान उद्योगांची स्थापना करून ग्रामीण विकासाचा मंत्र त्यांनी दिला.

आज नरेन्द्र मोदी सरकारने जे स्टार्ट अप इंडिया ,मेक इन इंडिया ,स्किल इंडिया, आत्म निर्भर भारत या धोरणात्मक योजना चरखा या गांधीजींच्या विचाराशी जुळणारे आहेत.

**गांधीजींच्या आर्थिक विचारांचे मूल्यमापन:-**

गांधीजींच्या विचारांचे वर्णन एका वाक्यात करावयाचे झाल्यास असे म्हणता येईल की, ते आपल्याला काळाच्या दोनशे वर्ष पुढे जन्मले होते. हे वाक्य विरोधात्मक असूनही वास्तविक दर्शन करणारे आहे. दोनशे वर्ष पुढे या भागातून त्यांच्या विचारातील दूरदर्शीपणा अपरिहार्यता दिसून येते. या विचारांची आजच्या परिस्थितीला व्यवहार्यता स्पष्ट होते. वेगळ्या शब्दात असे म्हणता येईल की, आजचे जग गांधीविचार स्वीकारणे इतके परिपक्व झालेले नाही,पण या विचारांना पर्याय नाही. भारत हे गांधीजींचे जन्मस्थळ आणि कर्म स्थळ होते. म्हणून गांधीजींच्या विचारांची स्वीकारण्याची प्रक्रिया भारतातून सुरू होणे आवश्यक आहे. या देशाने सुरुवात झालेली आहे परंतु अजून त्यासाठी खूप काही करणे गरजेचे आहे. जर आम्ही काही व्यावहारिक उपायांचा वापर केला तर गांधींचे विचार आदर्श ठरू शकतात.अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्रे भांडवलशाही राष्ट्रे आज आर्थिक मंदीच्या परिणामांना सामोरे जात आहेत. भौतिकवादाच्या अतिरेकामुळे हे दुष्परिणाम झालेले_दिसतात. म्हणून अशा देशांना पुन्हा नैतिक मुल्यांची गरज आहे. अशा विचारांना नैतिक अधिष्ठानाचे गरज आहे. अपरिग्रह, ग्रामस्वराज, यांत्रिकीकरणाला विरोध या गांधीजींचे आदर्श मूल्यांच्या आधारे विचार करण्याची गरज आहे.गांधीजींचे विचार आमलात आणने थोडे अवघड वाटते; परंतु जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या दोषांवर ते रामबाण उपाय आहेत.यावर नियंत्रण आणण्यासाठी साधी विचार असणे उपयुक्त ठरू शकते. गांधीजींचे आर्थिक विचार हे भारतीय अर्थव्यवस्थेला धरून होते. त्यांनी अनियंत्रित भांडवलशाही नफेखोरी, संपत्तीसंचय, आर्थिकशोषण अशा सर्व अतिरेकी वैशिष्ट्यांना गांधीजींनी विरोध केला होता. परिणामी पश्चिमात्य देशातील आर्थिक संकटां सारख्या धोक्यांपासून भारत दूर राहू शकतो याचबरोबर सत्य आणि अहिंसा या मूल्यांचे महत्त्व आजही कमी झालेले नाही. आजच्या डिजिटल

युगात फक्त गांधीजींच्या विचारांचे नवे संदर्भ शोधण्याची गरज आहे. त्यासाठी गांधीजीं प्रमाणे सत्य आणि अहिंसेचा मार्ग प्रामाणिक आणि अंगीकारला जाणे गरजेचे आहे.

**संदर्भ:**

महात्मा गांधी-हिज लाइफ अंड टाइम्स ,लुइस फिश्चेर,भारतीय विद्या भवन,२००३

स्टडीज इन गांधीजम ,निर्मल कुमार बोस ,नवजीवन पब्लिशिंग हाउस, दिल्ली

Chavan, S (2013). "Economic ideas of Mahatma Gandhi", Indian Streams Research Journal.vol 3(9).available at www.isrj.net.

Friedman, J. S. (2008). "Mahatma Gandhi's vision for the future of India: The role of Enlightened Anarchy ". Penn History Review, Vol. 16(1)